महाराष्ट्र शासन

**जलसंपदा विभाग**

मंत्रालय (मुख्य इमारत)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३३८१/०२२-२२७९३०५५

Email ID : dofa.wrd@maharashtra.gov.in

**ई-मेलने/अतितात्काळ**

क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.९०/२०२१/आ(क्षेप्र) दिनांक : १७ सप्टेंबर, २०२१.

प्रति

१) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा नाशिक

२) सर्व कार्यकारी संचालक

३) जलसंपदा विभागाच्या अधिनस्त सर्व मुख्य अभियंता

४) अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक/ अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणीतंटा लवाद कक्ष, पुणे/ अधीक्षक अभियंता व सचिव, महाराष्ट्र मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर.

५) सर्व अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, ठाणे/पुणे/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती.

**विषय :-सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल विहित वेळापत्रकानुसार लिहिणेबाबत.**

**संदर्भ :- उपसचिव, जलसंपदा विभाग यांचे क्र.गोपअ-२०२१/प्र.क्र.४०/गो.का., दिनांक १५ एप्रिल २०२१ चे आपणांस लिहिलेले पत्र.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन दिनांक १५ एप्रिल २०२१ चे शासन पत्र कृपया अवलोकन करावे.

२. सन २०२०-२१ या कालावधीतील कार्यमूल्यमापन अहवालांवर कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना संदर्भाधीन दिनांक १५ एप्रिल २०२१ च्या शासनपत्राच्या परिच्छेद २ व ३ मध्ये दिल्या आहेत.

३. वित्त विभागाने शासन परिपत्रक दिनांक १२ सप्टेंबर २०१३ अन्वये गोपनीय अहवाल विहित वेळापत्रकानुसार लिहिण्याची जबाबदारी पार न पाडणा-या अधिका-यांची दिनांक १ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ मंजूर न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या परिपत्रकातील परिच्छेद ४ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. तरी आपल्या व आपल्या अधिनस्त कार्यालयातून सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांची निवृत्तीविषयक लाभांची देयके संबंधित कोषागार अधिकारी कार्यालयांना सादर करतांना संबंधित अधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कर्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याची कार्यवाही पूर्ण केली असल्याची खातरजमा करण्याबाबत दक्षता घ्यावी.

आपली,

16/9/21

(यमुना जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

आ(क्षेप्र) संग्रहार्थ.